**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २१८** **दिनांक :- १५/०८/२०२१**

## स्वातंत्र्य दिनानिमीत्त मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालयाकडून रक्तदान शिबिराचे आयोजन.

७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमीत्त मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालयातर्फे दिनांक १५/०८/२०२१ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर रक्तदान शिबिरामध्ये पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी पोलीस अंमलदारांनी रक्तदान केले असून त्यामध्ये प्रामुख्याने श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, श्री. एस. जयकुमार, अप्पर पोलीस आयुक्त, श्री. महेश पाटील, पोलीस उपआयुक्त (गुन्हे), मिरा-भाईंदर, वसई-विरार या वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी देखील रक्तदान करुन सहभाग नोंदविला. सदरचे शिबीर हे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या स्वर्गीय भारतरत्न राजीव गांधी रक्तपेढी संस्था यांच्या सहयोगाने आप्पासाहेब धर्माधिकारी हॉल, मिरारोड पुर्व येथे आयोजित करण्यात आले होते. सदरचे शिबिरामध्ये पोलीसांनी उस्फुर्तपणे सहभागी होवून एकुण ११० पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदारांनी रक्तदान केले आहे.

त्याचप्रमाणे शिक्षणासाठी पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये राहणारे परराज्यातील विद्यार्थी यांचेसोबत संवाद साधण्याचे दृष्टीने मैत्री संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याअनुषंगाने परराज्यातील शिक्षणासाठी बाहेर असलेल्या विद्यार्थ्यांना पोलीस मुख्यालयातील ध्वजारोहणाचे कार्यक्रमास आमंत्रित करण्याचा अनोखा उपक्रम आयुक्तालयातर्फे राबविण्यात आला. सदरवेळी हजर असलेल्या विद्यार्थ्यांसोबत पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांनी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले.










----oooo-----